स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade




# Office of the Controller of Examinations


Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com


संदर्भ: पनिका/२०१५-१६/४६५४ दि. ०३.०३.२०१६

प्रति,
**मा.प्राचार्य,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय :- उन्हाळी-२०१६ परीक्षेसाठी सुविधा उपलब्ध नसलेल्या तसेच मान्यताप्राप्त प्राचार्य व शिक्षक नसलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा केंद्राबाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाचे परीपत्रक क्र.पनिका/उन्हाळी२०१६परीक्षा/२०१५-१६/४६१० दि.२३.०२.२०१६

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भिय परीपत्रकानुसार कळविण्यात येते की, उन्हाळी-२०१६ मध्ये होणा-या परीक्षेकरिता मा.विद्या परिषदेच्या ठरावानुसार सर्व प्रश्नपत्रिका e-Delivery पध्दतीने पाठविण्यात येणार आहेत. तसेच ज्या महाविद्यालयातील विद्यार्थी असतील त्याच महाविद्यालयास परीक्षा केंद्र देण्यात येणार आहे. मात्र ज्या महाविद्यालयात विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य व शिक्षक उपलब्ध नसतील तसेच Online Question Paper Delivery साठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसतील तर अशा महाविद्यालयास परीक्षा केंद्र देण्यात येणार नाही. या महाविद्यायातील विद्यार्थ्यांची परीक्षा दुस-या महाविद्यालयात घेण्यात येईल व त्यासाठी अशा महाविद्यालयांनी प्रति विद्यार्थी परीक्षा केंद्राचा अतिरिक्त परीक्षा खर्च म्हणून रु.५००/- भरणे अनिवार्य आहे असे उपरोक्त संदर्भांकिंत परीपत्राकान्वये कळविण्यात आलेले होते.

परंतू दि.०२.०३.२०१६ रोजी संपन्न झालेल्या मा.व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सदर अतिरिक्त परीक्षा शुल्क रु.५००/- ऐवजी रु.३००/- स्वीकारणेस मान्यता दिलेली आहे. तेव्हा याची कृपया नोंद घ्यावी व उपरोक्त परिच्छेद १ मध्ये नमुद केलेल्या महाविद्यालयांनी सदर अतिरिक्त शुल्क रु.३००/- प्रति विद्यार्थी अतिरिक्त परीक्षा शुल्क विद्यापीठात भरणा करुन पावती सादर करावी जेणेकरुन अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र निर्गमित करता येतील. जे महाविद्यालय वरीलप्रमाणे अतिरिक्त परीक्षा शुल्क भरणा करणार नाहीत अशा महाविद्यालयातील विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयीन प्रशासनाची व संबंधित संस्थेची असेल. सबब, याची नोंद घेवून परीक्षा विभागास सहकार्य करावे. हि विनंती.

आपला,

**परीक्षा नियंत्रक**